## निशाण क्र. ५५ वरील आदेश

वादी याने प्रस्तुतचा अर्ज वाद मुद्दयांमध्ये बदल करण्यासाठी दाखल केला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार त्याने दाव्यामध्ये मृत्यूपत्र आव्हानीत केले आहे व वाटपाची दाद मागितली आहे. सदरचे मृत्यूपत्र खरे असल्याबाबत प्रतिवादी क्र. १ ने म्हणणे मांडले आहे. मृत्यूपत्र आव्हानीत करणारा प्रस्तुतचा दावा असल्यामुळे मृत्यूपत्राच्या सत्यतेबाबतचा मुद्दा पुर्णतः प्रतिवादी क्र. १ वर काढला जाणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा मृत्यूपत्र आव्हानीत करण्यात आला असल्यामुळे त्याबाबत काढलेले नकारार्थी मुद्दे दुरुस्त करणे आवश्यक आहेत. सबब, निशाण क्र. ५३ ला गठीत केलेल्या मुद्दयांमध्ये बदल करण्यात यावेत व मुद्दे क्र. १, २, ४ व ६ रद्द करण्यात यावेत अशी वादीने विनंती केली आहे.

२. प्रतिवादी क्र. १ ने निशाण क्र. ५८ ला सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जातील मजकूर नाकारला आहे. त्याच्या म्हणण्यानुसार प्रस्तुतचा अर्ज खोटा आहे. न्यायालयाने गठीत केलेला मुद्दा क्र. १ हा योग्य व बरोबर आहे. अ.क्र. २, ३, ४ व ६ हे मुद्दे रद्द करणेस हरकत नाही. अर्जामध्ये नमूद केलेले अ.क्र. १ ते ४, ६ ते १० चे मुद्दे काढणेस प्रस्तुत प्रतिवादीची हरकत नाही. अर्जामधील अ.क्र. ५ चा मुद्दा न्यायालयाने यापूर्वीच गठीत केला आहे. वादी याच्या कथनानुसार दावा मिळकत सहदेव याने एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नातून खरेदी केली आहे हे शाबीत करण्याची जबाबदारी वादी याची आहे. अ.क्र. ६ चा मुद्दा काढण्याची गरज नाही कारण सदर मुद्दा अ.क्र. ४च्या मुद्दयाशी अंतर्गत आहे. येणेप्रमाणे प्रस्तुत प्रतिवादींनी सदरचे म्हणणे दाखल केले आहे.

३. वादी, प्रतिवादी क्र. १ तर्फे विद्वान विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

४. वादी याने वादातीत मृत्यूपत्र त्याच्यावर बंधनकारक नसल्याचा ठराव होणेबाबत दाद मागितली आहे. मात्र त्या अनुषंगाने मुद्दा गठीत केला नाही असे दिसून येते. सबब, सदर अधिकार घोषणेची दाद मंजूर होणस वादी पात्र आहे का ? याबाबतचा मुद्दा गठीत करणे न्यायोचित वाटते. वादी याने दाव्यामध्ये वादातीत मृत्यूपत्र हे त्याने दिलेल्या कारणास्तव संशयास्पद परिस्थितीत करण्यात आल्याचे कथन केले आहे. त्यामुळे त्याबाबतचा मुद्दा गठीत करणे आवश्यक वाटते. अर्जातील मुद्दा क्र. १ हा निशाण क्र. ५३ ला गठीत केलेल्या मुद्दा क्र. १ शी संलग्न असल्यामुळे सदर मुद्दा गठीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. अर्जातील मुद्दे क्र. २ व ३ हे मुद्दे निशाण क्र. ५३ ला गठीत केलेल्या मुद्दा क्र. ८ शी संलग्न असल्यामुळे सदर मुद्दे गठीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. अर्जातील मुद्दा क्र. ४ याकामी गठीत करण्यात आला नाही. सबब, वर नमुद केल्याप्रमाणे सदर मुद्दा गठीत करणे न्यायोचित वाटते. मात्र सदर मुद्दा शाबीत करण्याची जबाबदारी प्रतिवादी क्र. १ ची नसून वादीची आहे त्यामुळे सदर मुद्दा शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर ठेवण्यात येते. अर्जातील मुद्दा क्र. ५ हा दावा मिळकत ही मयत सहदेव याची स्वसंपादीत मिळकत आहे का ? याबाबत आहे. सदर वाद मुद्दयाचे निराकरण निशाण क्र. ५३ ला गठीत केलेल्या मुद्दा क्र. १ मध्येच करण्यात येणार आहे. त्यामुळे तसा वेगळा मुद्दा काढण्याची आवश्यकता नाही. अर्जातील मुद्दा क्र. ६ हा गठीत केलेल्या मुद्दा क्र. ३ शी संलग्न आहे. त्यामुळे तो गठीत करण्याची आवश्यकता वाटत नाही. अर्जातील मुद्दे क्र. ७ व ८ हे गठीत केलेल्या मुद्दे क्र. ५ व ७ शी संलग्न आहेत. त्यामुळे ते मुद्दे गठीत करण्याची आवश्यकता नाही. अर्जातील मुद्दा क्र. ९ वर नमूद केल्याप्रमाणे गठीत करण्यात येत आहे. गठीत केलेले मुद्दे क्र. १,२ ४, ६ हे मुद्दे वादी व प्रतिवादी क्र. १ यांनी केलेल्या कथनानुसार गठीत केले आहेत. त्यामुळे ते रद्द करण्याची आवश्यकता नाही. सबब, सदरचा अर्ज वरील प्रमाणे अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे असे मला वाटते. परिणामी मी खालील आदेश पारित करीत आहे :

## — <u>आदेश</u> —

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. निशाण क्र. ५३ ला गठीत केलेल्या मुद्दयांमध्ये बदल करण्यात येतो.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

देवगड
दिनांक ०९/०१/२०१७

( गि. सु. माने )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवगड.